होर्डिंग व बॅनर डिजिटल पध्दतीने फ्लेक्सद्वारे लावणे व हाताने रंगविण्याकरिताच्या संस्था निश्चित करणे

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१९ /प्र.क्र.९१ /३४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ७ जून, २०१९.

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्रमांक-मावज-२०१६/प्र.क्र.१९९/३४ दि.१४.०७.२०१६
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१६/प्र.क्र.१९९/३४ दि.३१.०३.२०१८
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१८/प्र.क्र.२४१/३४ दि.२१.०६.२०१८
४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१८/प्र.क्र.२४१/३४ दि.०८.१०.२०१८
५) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१८/प्र.क्र.२४१/३४ दि.२३.०१.२०१८
६) माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रदर्शने/२०१९/हो.बॅ.संस्था/का-६/४२ व८३ दि. ८/२/२०१९ व दि.१५ मार्च,२०१९

प्रस्तावना :-

शासनाच्या ध्येयधोरणांची, विविध जनकल्याणकारी योजनांची, कार्यक्रमांची माहिती सामान्य जनतेस होण्यासाठी, प्रदर्शनाची कामे करणाऱ्या संस्था तसेच होर्डिंग व बॅनर डिजिटल पध्दतीने फ्लेक्सद्वारे लावणे यासाठीच्या संस्थांच्या यादीस व दरास संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र.२ ते ५ अन्वये सदर संस्थाकडून काम करुन घेण्यास मुदत वाढ देण्यात आली आहे. सदर मुदत वाढ संपल्यामुळे संस्थांची नवीन यादी तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासनाच्य ध्येय व धोरणाची, विविध जनकल्याणकारी योजनांची/ कार्यक्रमांची माहिती व प्रसिध्दी देणे यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या तसेच अल्पबचत संचालनालयाच्या राज्यातील विविध ठिकाणी असणाऱ्या होर्डिंगचा वापर केला जातो, तसेच काही ठिकाणी बॅनर्स लावण्यात येतात. होर्डिंगवर मजकूर लावणे, काढणे, बॅनर तयार करणे व लावणे इत्यादी कामे करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विहित पध्दतीने दिनांक १३/१०/२०१८ रोजी राज्यातील महत्त्वाच्या वृत्तपत्रात तसेच शासनाच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदेद्वारे विहित नमुन्या अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी महासंचालनालयाच्या खरेदी समितीने शिफारस केल्यानुसार खालील कामांसाठी खालील संस्थांची नियुक्ती करण्यास व दरास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. राज्यात अस्तित्वात असलेल्या २०x१० फूट आकाराच्या होर्डिंग्जवर फ्लेक्स छपाई करुन संदेश प्रसारित करणे

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	प्रति चौ. दर फू.
१.	मे.इम्पॅक्ट ॲडव्हर्टायजिंग ३-२२-७८, रेल्वे स्टेशन रोड, जालना ४३१ २०३ मो.क्र.९३२६२३६९९९/९४०४०४४४८	नागपूर	१०.२८
		लातूर	९.७८
		औरंगाबाद	८.९८
		अमरावती	१०.२८
२.	मे.अलका प्रिंटर्स डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, जेल रोड, धुळे ४२४ ००१ मो.क्र.९४२३९८२१७०/९४२२२८९५२०	मुंबई	१२
		कोकण विभाग	१२
		नाशिक	११.२५
		कोल्हापूर	११.५०
		पुणे	१०.७८

२. डिजिटल पध्दतीने फ्लेक्स बॅनर्स छपाई करुन सार्वजनिक ठिकाणी लावणे

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	प्रति चौ. दर फू.
१.	मे.इम्पॅक्ट ॲडव्हर्टायजिंग ३-२२-७८, रेल्वे स्टेशन रोड, जालना ४३१ २०३ मो.क्र.९३२६२३६९९९/९४०४०४४४८	मुंबई व मुंबई उपनगर	७.८५
		नागपूर	६.४८
		लातूर	६.४८
		औरंगाबाद	६.४८
		अमरावती	७.८५
२.	मे.अलका प्रिंटर्स डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, जेल रोड, धुळे ४२४ ००१ मो.क्र.९४२३९८२१७०/९४२२२८९५२०	कोकण विभाग	७.८५
		नाशिक	६.७८
		कोल्हापूर	७.८५
		पुणे	६.७८
		अमरावती	७.८५

२. संस्थेची वरील यादी व त्यांचे दर या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षे किंवा नविन यादी/दर तयार करेपर्यंत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०७१४४७५१५४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan
Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.06.07 14:54:46 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक,माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२/, मुंबई/ नागपूर
३. महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र१/२,मुंबई/नागपूर.
४. संचालक (माहिती) (प्रशासन),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
७. उपसंचालक(लेखा),माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२.
८. संबंधित संस्था (माहिती जनसंपर्क महासंचालनालयामार्फत)
९. निवड नस्ती/कार्या-३४